TARUN BHARAT, Mumbai, 21.12.2023
Page No. 2, Size:(14.88)cms X (12.37)cms.

## Bullet train stations decorated with local traditions

# बुलेट ट्रेनच्या स्थानकांना स्थानिक परंपरेचा साज

## अभियांत्रिकी आविष्कारांसह प्रकल्पाच्या उभारणीला गती

गायत्री श्रीगोंदेकर

**मुंबई, दि. २० :** देशातील सर्वात वेगवान बुलेट ट्रेनची प्रतीक्षा लवकरच संपणार असून गुजरातप्रमाणेच महाराष्ट्राच्या हद्दीतील कामांना गती प्राप्त झाली आहे. बुलेट ट्रेनच्या मार्गाच्या उभारणीसह स्थानकांचे स्थापत्य उभारणीतही अभियांत्रिकी आविष्कार असणार आहेत. स्थानकांचे अंतरंग आणि प्रवेशद्वार हे त्या-त्या प्रदेशाचे प्रतिनिधित्व करणारे असेल. 'नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'च्या माध्यमातून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम सुरू आहे. या मार्गातील एकमेव भुयारी स्थानकाचे मुंबईतील बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील काम सुरु झाले आहे. बीकेसी टर्मिनस (पान ६ वर)



**उत्खनन** ३२ मीटर खोल १८ लाख घनमीटर








### बोईसर स्थानक मासेमारीच्या जाळ्यात

बोईसर स्थानकाचे प्रवेशद्वार हे मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या जाळ्याच्या आकाराच्या प्रतिकृतीचे प्रतिनिधित्व करणार आहे. दोन्ही बाजूला प्लॅटफॉर्म आणि मध्ये चार ट्रॅक असतील. स्थानकापासून बोईसर-चिल्लर फाटा ३०० मीटर, बोईसर रेल्वे स्थानक ५.४ किमी, बोईसर बस स्थानक सहा किमी, पालघर जिल्हा मुख्यालय १२.७ किमी, ४८ क्रमांकाचा नॅशनल हायवे १३.६ किमी अंतरावर आहे.

### विरारला पर्वत रांगांची झुळूक

विरार स्थानकाला पर्वत रांगातून वाहणाऱ्या हवेच्या झुळुकेची प्रतिमा असेल. दोन्ही बाजूला प्लॅटफॉर्म आणि मध्ये चार ट्रॅक असतील. हे चारही ट्रॅक वैशिष्ट्यपूर्ण असतील त्याच्या जोडीला दोन प्लॅटफॉर्म असणार आहेत. या स्थानकापासून विरार लोकल रेल्वे स्थानक आठ किमी, पेल्हार रोड एक किमी, विरार नालासोपारा रोड ४.५ किमी, चंदनसर रोड ९.५ किमी, ४८ क्रमांकाचा राष्ट्रीय महामार्ग सहा किमी अंतरावर आहे.

### ठाणे स्थानकात नदीच्या लाटा

ठाण्यातील स्थानक हे उल्हास नदीपासून काही अंतरावर असल्याने या स्थानकाचे बाह्यरंग हे नदीच्या लाटांच्या शांत लहरीच्या आकाराचे असेल. जमिनीपासून १५ मीटर उंचीवर असणारे हे स्थानक प्रस्तावित विरार-अलिबाग एमएमसीपासून एक किमी अंतरावर असेल, तर दिवा लोकल रेल्वे स्थानकापासून तीन किमी तर दातिवलीपासून एक किमी अंतरावर असेल.

### सागरी लाटांचे बीकेसी स्थानक

बीकेसी स्थानक ढगांचे पुंजके आणि सागरी लाटांच्या आकाराचे प्रतिनिधित्व करेल. सहा फलाट असणारे हे स्थानक अंदाजे जमिनीखाली २४ मीटर खोलीवर असेल. इतकेच नाही, तर बीकेसी हाय स्पीड स्थानकाला मेट्रो लाईन २बच्या जवळच्या मेट्रो स्थानकाला जोडणारा आणि एमटीएनएल इमारतीकडे जाण्यासाठी दोन प्रवेश आणि बाहेर पडण्याचा मार्ग असेल.

---

## बुलेट ट्रेनच्या स्थानकांना स्थानिक परंपरेचा साज

हे या प्रकल्पातील एकमेव भूमिगत स्थानक आहे. अभियांत्रिकी अविष्कार असणाऱ्या या स्थानकाच्या पायाभरणीला सुरुवात झाली असून बॉटम-अप पद्धतीचा वापर करून हे स्थानक बांधले जाणार आहे. जमिनीच्या पातळीपासून खोदकाम सुरू होईल आणि पायापासून काँक्रीटचे काम केले जाईल. स्टेशनसाठी आवश्यक उत्खनन ३२ मीटर खोल तर अंदाजे १८ लाख घनमीटर इतके आहे.